जाहिरात छोटी
संधी मोठी
संपर्क करा
8850541939
9821004969

साप्ताहिक
RNI No. MAHMAR/2011/39072

# युवा सह्याद्री

मुख्य संपादक: अरुण आत्माराम माळी
वृत्तपत्र नव्हे, चळवळ

मुंबई | वर्ष : १५ | अंक : ४७ | बुधवार दिनांक : १० डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२५ | पृष्ठ : ८ | कार्यकारी संपादक : विवेक मोरे | मूल्य : २ ₹

# केंद्रातील मोदी सरकार कोसळणार ....!!!



## नीतीश, शिंदे आणि नायडू यांच्या नाराजीचा केंद्रातील भाजप सरकारवर परिणाम होणार का?

## सोशल मीडियावर चर्चेला उधाण

देशाच्या राजकारणात गेल्या काही दिवसांत अचानक तापमान वाढले आहे. सोशल मीडियावर असा दावा मोठ्या प्रमाणात केला जात आहे की नीतीश कुमार भाजपवर नाराज असून, तेजस्वी यादवसोबत सत्ता परिवर्तनाचा विचार करीत आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे देखील भाजपच्या काही निर्णयांवर असमाधानी असल्याचे चर्चेत आहे.

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांची नाराजीही राष्ट्रीय राजकारणात लक्ष वेधत आहे. यामुळे लोकांमध्ये एकच प्रश्न, केंद्रातील भाजप सरकारला धोका आहे का?

**बिहारचे समीकरण:- नाराजी आहे, पण सरकार पडण्या - इतकी नाही.**

बिहारमध्ये BJP–JDU सरकार सत्तेत आहे.

होय, नीतीश कुमार आणि भाजपमध्ये काही मतभेद आहेत. काही सोशल मीडिया चॅनेल्स दावा करत आहेत की नीतीश तेजस्वी यादवसोबत पुन्हा जुळवून घेतील. परंतु वास्तव हे आहे की,बिहार मधील बदलांचा लोकसभा बहुमतावर थेट परिणाम होत नाही. नीतीश यांच्या पक्षाकडे लोकसभा मध्ये मर्यादित खासदार आहेत. त्या आधारावर केंद्र सरकार पडू शकत नाही. म्हणून बिहारची नाराजी राजकीय दबाव निर्माण करू शकते, पण सरकार ढळवण्या इतकी नाही.

**महाराष्ट्रातील परिस्थिती — शिंदे गटात नाराजी, पण निर्णय नाही.**

महाराष्ट्रात सध्या सत्ता भाजप – शिंदे गटाकडे आहे. शिंदे गटातील काही स्थानिक नेत्यांना भाजपची वाढती घुसखोरी त्रासदायक ठरत आहे. त्यामुळे नाराजी नक्कीच आहे. परंतु, शिंदे गटाकडे लोकसभा खासदार फार कमी आहेत. त्यामुळे त्यांनी समर्थन काढले तरी केंद्र सरकार पडणार नाही.

महाराष्ट्रातील बदल राज्य पातळीवर मोठे आहेत, केंद्रावर नाही. म्हणून सध्या शिंदे गटाकडून समर्थन काढण्याची व्यवहार्य शक्यता अत्यंत कमी आहे.

**आंध्रप्रदेश — नायडूचा दबाव वाढतोय**

चंद्राबाबू नायडू हे केंद्राकडून खास आर्थिक मदतीची मागणी करीत आहेत. त्यांची नाराजी सर्वात गंभीर मानली जाते. जर नायडू तटस्थ राहिले तरी, केंद्रातील स्थिर बहुमतावर थेट मोठा धोका नाही.

पण राजकीय समिकरणांमध्ये तात्पुरता खळबळ माजू शकते. त्यामुळे केंद्र सरकारवर थेट परिणाम होण्याची शक्यता किती?

अत्यल्प...! याचे मुख्य कारण म्हणजे, भाजप–NDA कडे लोकसभा मध्ये स्थिर बहुमत आहे. कोणतेही राज्य सरकार बदलले तरी लोकसभा संख्या बदलत नाही. सर्व नाराजी “दबाव तंत्र” आहे, थेट सरकार पाडण्याची हालचाल नाही. सरकार पडण्यासाठी किमान ४० ते ४५ खासदार तटस्थ किंवा विरोधात जाणे आवश्यक आहे. सध्या तिन्ही राज्यांतील नाराजी त्या पातळीला पोहोचलेली नाही.

**निष्कर्ष** — सोशल मीडियावर मोठा गाजावाजा, पण वास्तविक राजकीय धोका नाही. बिहार, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या तिन्ही राज्यांमध्ये नाराजी, चर्चा आणि राजकीय खटाटोप सुरू आहे, पण केंद्रातील भाजप सरकारला तात्काळ किंवा मोठा धोका सध्याच्या आकडेवारी नुसार नाही. जेवढं सोशल मीडियावर प्रकरण चढवून मांडलं जात आहे, तेवढ्या प्रमाणात राजकीय जमीन वास्तवात हललेली नाही.

दरम्यान मित्रपक्षांच्या सोबत असलेली भाजपची एकूणच दगाबाजी करण्याची भूमिका पाहता बिहार, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्रातील घडामोडी पाहता या तिन्ही राज्यातील पक्षांनी एकत्र भूमिका घेतल्यास केंद्रातील सत्तासंघर्षात मोठा भूकंप होण्याची शक्यता नाकारता येत नाही...



संपादक -
अरुण आत्माराम माळी

## संपादकीय

## "स्त्रीच्या सुरक्षिततेपेक्षा भाषेची सक्ती महत्त्वाची?"

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात जर महिलांवरील अत्याचार एवढ्या प्रमाणात वाढत असतील, तर आपली सामाजिक स्थिती आणि सरकारची प्राथमिकता तपासून पाहण्याची ही वेळ आहे. रोज १०० हून अधिक महिला किंवा मुली बेपत्ता होतात, बलात्काराची प्रकरणं थेट शाळांपासून ते शासकीय रुग्णालयांपर्यंत घडतात – आणि तरीसुद्धा हे प्रश्न "सामान्य" म्हणून दुर्लक्षित केले जातात.या साऱ्याच्या पार्श्वभूमीवर सरकार मात्र हिंदी भाषा सक्तीचा अजेंडा पुढे रेटत आहे. शाळांमध्ये हिंदी सक्ती, प्रशासनात हिंदी वापर, आणि इतर भाषांवर गुदमरवणारा दबाव – हे मुद्दे सरकारसाठी अधिक महत्त्वाचे आहेत का?

स्त्रीचा सन्मान, तिची सुरक्षितता, आणि न्यायव्यवस्थेचा विश्वास जपणे ही कुठल्याही सुसंस्कृत राष्ट्राची प्राथमिक जबाबदारी असते. पण आज स्त्रीच्या हक्कांपेक्षा भाषेचं राजकारण महत्त्वाचं मानलं जातंय. एकीकडे "बेटी बचाओ"च्या घोषणा, आणि दुसरीकडे त्याच मुलींवर होणारे अत्याचार – हा विरोधाभास स्पष्ट आहे.

राज्य सरकार किंवा केंद्र सरकारने जर महिलांच्या सुरक्षेला खऱ्या अर्थाने गांभीर्याने घेतले असते, तर ठाणे, नागपूर, बीड, यवतमाळसारख्या भागांत इतक्या घटना घडल्या नसत्या. फक्त भाषाविषयक एकसंधतेवर लक्ष केंद्रित करून, सामाजिक असुरक्षितता नजरेआड करणं ही मोठी चूक आहे.भाषा, शिक्षण, संस्कृती याही महत्त्वाच्या आहेत, पण त्याहून महत्त्वाचं आहे – एखाद्या मुलीला रात्री घरी सुरक्षित परतता येणं.नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) २०२३ पूर्वमाहितीनुसार, महाराष्ट्रात दररोज सरासरी १०३ महिला व मुली बेपत्ता, आणि ८–१० बलात्काराची प्रकरणे नोंदली जात आहेत.

मात्र, राज्य महिला आयोग किंवा पोलिस प्रशासनाकडून त्वरित आणि ठोस पावले उचलली जात नाहीत.राजकीय हत्यांच्या संदर्भातही संशयास्पद प्रकार वाढले आहेत. काही महिला सामाजिक कार्यकर्त्यांवर दबाव, धमक्या आणि आत्महत्या घडवून आणण्याचे प्रकार घडले, मात्र यांची तपासयंत्रणा आजही संथ आहे.दुसरीकडे, सरकारकडून हिंदी भाषा सक्तीचा आग्रह, शाळा, महाविद्यालयांमध्ये अनिवार्य हिंदीचा प्रसार यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. परंतु नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न जसा आहे तसा सोडवला जात नसल्याची तक्रार महिलांच्या संघटनांनी केली आहे.

महिला आयोग, पोलिस यंत्रणा, आणि न्यायप्रक्रियेतील विलंब या साऱ्यांचा शेवटचा फटका महिलांनाच बसतोय, हे चित्र गंभीर आणि वेदनादायक आहे. महाराष्ट्र राज्याचे गृह मंत्रालय याबाबत आतातरी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन कठोर पावले उचलतील हिच जनतेची अपेक्षा.

# इंडिगो सेवा व्यत्ययावर नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाची कारवाई - प्रवाशांना परतफेड संरक्षण



**मंत्रालयाने इंडिगोला सर्व प्रवाशांची प्रलंबित परतफेड रक्कम विनाविलंब देण्याचे दिले निर्देश**

**नवी दिल्ली**: नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने इंडिगोला सर्व प्रवाशांचे तिकिटांचे प्रलंबित पैसे विनाविलंब परत देण्याचे निर्देश दिले आहेत. रद्द केलेल्या किंवा विस्कळीत झालेल्या सर्व उड्डाणांसाठी परतफेड प्रक्रिया रविवार, 7 डिसेंबर 2025 रोजी रात्री 8:00 वाजेपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मंत्रालयाने दिले आहेत. उड्डाण रद्द झाल्यामुळे ज्या प्रवाशांचा प्रवास प्रभावित झाला आहे, त्यांच्यासाठी कोणतेही पुनर्निर्धारण शुल्क आकारू नये, असे निर्देश विमान कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच परतफेड प्रक्रियेत कोणताही विलंब केल्यास किंवा अनुपालन न केल्यास त्वरित नियामक कारवाई केली जाईल असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

**विशेष प्रवासी सहाय्य आणि परतफेडीसाठी कक्ष-** तक्रारींचे निवारण सुलभ व्हावे यासाठी समर्पित प्रवासी सहाय्य आणि रकमेच्या परतफेडीसाठी सुविधा कक्ष स्थापन करण्याचे निर्देश इंडिगोला देण्यात आले आहेत. या कक्षांना बाधित प्रवाशांशी सक्रियपणे संपर्क साधण्याचे तसेच अनेक पाठपुराव्याशिवाय परतफेड आणि पर्यायी प्रवास व्यवस्था होईल याची खात्री करण्याचे काम देण्यात आले आहे. उड्डाणांचे वेळापत्रक पूर्णपणे स्थिर होईपर्यंत स्वयंचलित परताव्यांची प्रणाली सक्रिय राहील.

**सामान हाताळणीबाबत हमी-**

मंत्रालयाने इंडिगोला उड्डाण रद्द झाल्यामुळे किंवा विलंबामुळे प्रवाशांपासून दूर गेलेले सर्व बॅगेज शोधून प्रवाशांच्या निवासस्थानी किंवा त्यांनी निवडलेल्या पत्त्यावर पुढील 48 तासांच्या आत पोहोचवले जाईल याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत. ट्रॅकिंग आणि डिलिव्हरीच्या वेळेबाबत प्रवाशांशी स्पष्ट संवाद राखण्यास आणि विद्यमान प्रवासी हक्क नियमांनुसार आवश्यक असल्यास भरपाई देण्याचे निर्देश विमान कंपन्यांना देण्यात आले आहेत.

**प्रवाशांसाठी शून्य गैरसोय धोरण-** या व्यत्ययाच्या काळात प्रवाशांचे हक्क पूर्णपणे संरक्षित केले जातील, याची खात्री करण्यासाठी नागरी हवाई वाहतूक मंत्रालय विमान कंपन्या, विमानतळ, सुरक्षा संस्था आणि परिचालन संबंधित सर्व हितधारकां सोबत सातत्याने समन्वय साधत आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी, विद्यार्थी, रुग्ण आणि तातडीच्या प्रवासाची आवश्यकता असलेल्या सर्वांसाठी योग्य सुविधा सुनिश्चित करण्यासाठी देखरेख यंत्रणा अधिक मजबूत करण्यात आल्या आहेत.

परिस्थिती पूर्ववत होण्याच्या प्रक्रियेवर मंत्रालय बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि लवकरात लवकर कामकाज सामान्य करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे.

## मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मैदाने पोलिस भरती सरावासाठी उपलब्ध करून द्या. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेची मागणी

मिरा भाईंदर: मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच मैदाने शहरातील तरुणांना पोलिस भरतीकरिता पूर्ण वेळ सराव, व्यायाम करण्याकरिता उपलब्ध करुन त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मनपा व पोलिस प्रशासनाकडून उपाय योजना करण्यात याव्यात, याकरिता महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व पोलीस आयुक्तांना आग्रही मागणी करताच तात्काळ कार्यवाही करण्याची सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पीएम-किसान आणि प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा विस्तारित लाभ

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी महाराष्ट्रातील ९३.८१ लाख अर्ज

**मुंबई**: पीएम-किसान योजना ही केंद्रीय क्षेत्रातील एक अशी योजना आहे जी पंतप्रधानांनी फेब्रुवारी २०१९ मध्ये लागवडीयोग्य जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी सुरू केली होती. तिच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांना आधारशी जोडलेल्या बँक खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) वार्षिक ₹६,००० चा आर्थिक लाभ मिळू शकतो. लागवडीयोग्य जमीन हा या योजनेचा मूलभूत पात्रता निकष आहे, मात्र उच्च आर्थिक स्थितीशी संबंधित काही विशिष्ट अपवाददेखील आहेत. नोंदणी आणि पडताळणीमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करणाऱ्या शेतकरी-केंद्रित डिजिटल पायाभूत सुविधांच्या आधारे भारत सरकारने या योजनेच्या सुरुवातीपासून ४.०९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम २१ हप्त्यांमध्ये वितरित केली आहे, ज्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जारी करण्यात आलेले एकूण १९९३.६६ कोटी रुपये समाविष्ट आहेत. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या पीएम-किसान योजनेच्या २१ व्या हप्त्याचा देशभरातील ९.३४ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना फायदा झाला, त्यापैकी ४,६३,१४२ लाभार्थी कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत.

२०१६ च्या खरीप हंगामापासून सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री पीक विमा योजना (पीएमएफबीवाय) प्रामुख्याने क्षेत्र-आधारित दृष्टिकोनावर राबविली जाते आणि शेतकऱ्यांना पिकांच्या पेरणी पूर्वीपासून ते कापणीनंतरच्या सर्व बिगर प्रतिबंधित नैसर्गिक जोखमींविरुद्ध व्यापक जोखीम छत्र कमीतकमी प्रीमियममध्ये उपलब्ध करून देते. राज्य सरकारांनी सादर केलेली उत्पन्न आकडेवारी आणि कार्यचलित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये विहित पद्धतीने आणि दाव्यांच्या गणना सूत्राच्या आधारे, विमा कंपन्यांद्वारे दाव्यांची गणना केली जाते आणि थेट विमाधारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केली जाते. हप्ता अनुदानाचा केंद्र आणि राज्य सरकारचा हिस्सा मिळाल्यावर दावे मंजूर केले जातात.

या योजनेमध्ये गारपीट, भूस्खलन, पाणी साचणे, ढगफुटी, नैसर्गिक कारणाने आग लागणे यांसारख्या स्थानिक स्वरुपातील नुकसानीचा समावेश केला गेला आहे. तसेच चक्रीवादळ, चक्रीवादळा च्या परिस्थितीत पाऊस अथवा अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे होणाऱ्या काढणीपश्चात नुकसानीचाही समावेश केला गेला आहे. शेतकरी राष्ट्रीय पीक विमा पोर्टल आणि प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या ॲपसह अनेक माध्यमांतून अशा नुकसानाची माहिती देऊ शकतात. मात्र, महाराष्ट्र शासनाने अलीकडील पूर-संबंधित पीक नुकसानीच्या संदर्भात खरीप २०२५ च्या हंगामाच्या संबंधात कोणतीही स्थानिक आपत्ती सूचित केलेली नाही, आणि हंगामाच्या अखेरीला केले जाणारे दावे हे राज्य शासनाने दिलेल्या उत्पादनाच्या माहितीवरून काढले जातील. तसेच, राज्य शासनाने ऊस पिकाबाबतही प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत सूचित केलेले नाही.

२०२५–२६ या वर्षासाठी, महाराष्ट्राने प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत मूलभूत संरक्षण निवडले आहे, यात पेरणीपासून ते काढणीपर्यंत उभ्या पिकाच्या उत्पादन नुकसानीच्या विमा संरक्षणाचा अंतर्भाव आहे, आणि त्यात दुष्काळ, कोरडा कालावधी, पूर, जलमयता, गारपीट आणि चक्रीवादळे अशा टाळता न येण्याजोगे धोक्यांचा समावेश आहे. या संरक्षणाअंतर्गत, केवळ क्रॉप कटिंग एक्सपेरीमेंट्स (सीसीई) द्वारे निर्धारित केलेल्या उत्पादनातील तुटीच्या आधारावर दावे निकाली काढले जातात. म्हणूनच या टप्प्यावर प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत, सप्टेंबर २०२५ मधील पूर संबंधित पीक नुकसानीची माहिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

राज्य शासनाने सीसीई आधारित उत्पादन अंतिम करण्याची सूचित केलेली तारीख पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे : मूग आणि उडीद यासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत, कापूस २८ फेब्रुवारीपर्यंत, तूर आणि कांदा ३१ मार्चपर्यंत आणि इतर सर्व खरीप पिकांसाठी ३१ जानेवारीपर्यंत.

खरीप हंगाम २०२५ दरम्यान, महाराष्ट्रात प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत एकूण ९३.८१ लाख अर्ज दाखल झाले होते. या हंगामासाठी असलेले विमा हफ्त्यापोटीचे अनुदान १,८६६.२२ कोटी रुपये इतके होते. ही रक्कम केंद्र आणि राज्य शासनाने समान प्रमाणात खर्च केली आहे. या योजनेंतर्गत बहुतांश दावे संबंधित विमा कंपन्यांना आवश्यक उत्पादन माहिती आणि विमा हफ्त्यापोटीचे अनुदान मिळाल्यानंतर २१ दिवसांच्या आत निकाली काढले जातात.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी आज लोकसभेत यासंदर्भातील एका तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली आहे.

## मीरा रोड शिव सेना जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा संपन्न

मीरारोड (प्रतिनिधी ): शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या प्रभाग क्र. १२ चे विभाग प्रमुख कानजीभाई हरीभाई चौहान यांच्या देवतारा हाईट्स, रामदेव पार्क, मीरा रोड येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शिवसेना उपनेते -संपर्क प्रमुख विनोद घोसाळकर यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.या प्रसंगी जिल्हा प्रमुख प्रभाकर म्हात्रे, महिला जिल्हा संघटिका नीलम ढवण, उप जिल्हा संघटिका जयलक्ष्मी सावंत, जिल्हा समन्वयक मनोज मयेकर, शहर प्रमुख राजाराम सावंत, मीरा रोड राजपूत समाज प्रमुख खिमजिभाई राठोड, जैन समाज प्रमुख पारसभाई जैन, पटेल समाज



प्रमुख बाबू भाई गामी, कच्छी समाज प्रमुख दिपकभाई गाला, अहिर समाज प्रमुख चेतनभाई अहिर, ब्राह्मण समाज प्रमुख काशीराम जाटावाडिया, शाखा प्रमुख विशाल पेवेकर, उप शाखा प्रमुख जय प्रताप सिंह इत्यादीसह विभागातील सर्व महिला पुरुष पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवराज्य चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मराठी उद्योजकांचे जाळे उभारण्याचा प्रेरणादाई उपक्रम

मराठी उद्योजकांनी दरमहा एकत्र यावं, एकमेकांना मदत करावी, आपले व्यवसायामध्ये मदत व्हावी याचबरोबर एकत्र येऊन भविष्यात मोठे प्रकल्प उभे राहावेत, याकरता समृद्ध मराठी चेंबर ऑफ कॉमर्स या प्लेटफॉर्मचे शिवस्वराज्य लोक चळवळीच्या माध्यमातून निर्मिती झाली आहे. या बिझनेस ग्रुप ची तिसरी शाखा पालघर जिल्ह्यात सुरू केली. मुंबई शहर आणि उत्तर मुंबई या दोन शाखा सुरू आहेत लवकरच कोकणातील सर्व जिल्ह्यात आणि पुणे ठाणे सर्व प्रमुख शहरांमध्ये मराठी उद्योजकांचे संघटन चेंबरच्या माध्यमातून करण्यात येत आहे. समृद्ध मराठी आणि समृद्ध महाराष्ट्र ही चळवळ मराठी माणसांच्या आर्थिक समृद्धीच्या माध्यमातून झाली पाहिजे. धडपडणारे मराठी उद्योगी युवक एकत्र यावेत याकरता छोट्या उद्योजकांसाठी शिवस्वराज्य मराठी उद्योजक समूह आणि मोठ्या उद्योजकांसाठी समृद्ध मराठी चेंबर ऑफ कॉमर्स काम करणार आहे. काल पालघर जिल्ह्यातील प्रमुख २५ उद्योजकांचे उपस्थितीमध्ये याचा आरंभ झाला. यावेळी चेंबरचे सीईओ राम कोळवनकर, पालघर चे प्रमुख समन्वयक आशिष बर्वे आणि मान्यवर उद्योजक उपस्थित होते. काल या बैठकीला आवर्जून उपस्थित राहिलो.

**संजय यादवराव** - संस्थापक शिवस्वराज्य मराठी लोक चळवळ

# जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा



नवी मुंबई : लायन हार्ट ग्रुप नवी मुंबई व पनवेल महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दिव्यांग बांधवांसाठी विविध नवीन योजनांचे उद्घाटन तसेच बहुविध उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन कलंबोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेक्षागृहात करण्यात आले.या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते झाले. यावेळी दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक बी.जी. पाटील, लायन हार्ट ग्रुप नवी मुंबईचे संस्थापक अध्यक्ष विरेंद्र म्हात्रे उर्फ गुरुभाई, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, हाजी शहानवाज खान फाउंडेशनचे अध्यक्ष कोविड योद्धा हाजी शहानवाज खान, महापालिकेच्या उपायुक्त ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, तसेच दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे प्रतिनिधी, दिव्यांग बांधव, त्यांचे पालक आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहिले. दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रमाला रंगत आली. पनवेल महापालिकेतर्फे दिव्यांग बांधवांसाठी उपलब्ध सुविधा, जेवण, आरोग्य शिबिर, नवीन योजना आणि समावेशकतेसाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती या कार्यक्रमातून देण्यात आली.

# मुंबईतील सर्वात मोठे शॉपिंग मार्केट, जिथे अतिशय स्वस्त दरात मिळतात ट्रेंडी कपडे

लिंकिंग रोड – यामार्केटमध्ये कपडे, बूट्स, बॅग्स, ॲक्सेसरीज सगळं काही कमी दरात आणि व्यवस्थित मिळतं. बजेट मधल्या दरात पण ट्रेंडी वस्तू तुम्हाला या मार्केटमध्ये मिळतील. जर तुम्ही कॉलेजमध्ये जात असाल आणि जीनस, टॉप्स, कॅज्युअल वेअर शोधत असाल, तर हा मार्केट खूप चांगला आहे.



हील रोड – वांद्रे येथील हे मार्केट फार प्रसिद्ध आहे. वेस्टर्न कपडे, कॅज्युअल व पार्टी वेअर, फूटवेअर आणि ॲक्सेसरीझसाठी तरुणी मार्केटमध्ये जातात. या भागात फार इतकी गर्दी नाही, त्यामुळे काहीशी शांत वातावरणात खरेदी करता येते. ट्रेंडी पण बजेटमध्ये कपडे हवे असल्यास हा एक चांगला पर्याय आहे.

फॅशन स्ट्रीट – याठिकाणी तब्बल 150-300 पेक्षा अधिक स्टॉल्स आहेत. जेथे तुम्हाला ट्रेंडी टी-शर्ट्स, जीन्स, पार्टी वेअर, कॅज्युअल कपडे खूप स्वस्त दरात मिळतील… पण काही वेळा क्वॉलिटी चेक करणं फार महत्त्वाचं आहे. काही कपडे फक्त काही दिवस वापरण्यासाठी असू शकतात.

क्रॉफोर्ड मार्केट – क्रॉफोर्ड मार्केट जवळपास 150 वर्ष जुनं मार्केट आहे. या मार्केटमध्ये कपडे आणि फॅशनच्या गोष्टींसाठी प्रसिद्ध नाही. तर या मार्केटमध्ये स्वयंपाकघर आणि जीवनशैलीशी संबंधित गोष्टी, होम डेकॉरसाठी लागणाऱ्या गोष्टी मोठ्या प्रमाणात दिसून येईल.

चोर बाजार – तुम्हाला तुमच्या घराला आकर्षक लूक द्यायचा असेल तर चोर बाजार तुमच्यासाठी योग्य आहे. इतर मार्केटच्या तुलनेत इथल्या वस्तू थोड्या महाग असतील, पण तुम्हाला इथे मिळणाऱ्या गोष्टी इतर कोणत्याही मार्केटमध्ये मिळणार नाहीत. येथे तुम्हाला होम डेकॉरसाठी लागणारे दिवे, फोटो फ्रेम्स, फर्निचर आणि अशा अनेक गोष्टी मिळतील. ज्यामुळे तुमचं घर अधिक आकर्षक वाटेल…

लोखंडवाला मार्केट – मुंबईमधील लोखंडवाला मार्केट देखील फार मोठं मार्केट आहे. याठिकाणी महिलांसोबतच पुरुषांसाठी देखील कपडे, फोन अक्सेसरीज मिळतात. येथे तुम्हाला अतिशय स्टायलिश कपडे मिळू शकतात याठिकाणी मुलांसाठीही खरेदीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. जर तुम्हाला खरेदी सोबतच खाण्यापिण्याची आवड असेल तर येथे तुम्ही स्वादिष्ट खाद्यपदार्थ आणि पेये, चाट, पाणीपुरी, लस्सी इत्यादींचा आनंद घेऊ शकता.

# शीव उड्डाणपूल जूनपर्यंत; पावसाळ्या आधी सर्व कामे पूर्ण करण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट



मुंबई : शीव (सायन) उड्डाणपुलाच्या काम मे २०२६पर्यंत पूर्ण होणार आहे. या उड्डाणपुलाची कामे मे २०२६पर्यंत पूर्ण झालीच पाहिजेच, असे निर्देश मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे जून २०२६पासून पूल वाहतुकीस खुला होईल, असे संकेत आहेत.

शीव पूर्व-पश्चिम भागांना जोडणाऱ्या शीव उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचा आढावा अतिरिक्त महापालिका आयुक्त बांगर आणि पोलिस सहआयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे यांनी मंगळवारी घेतला. त्यावेळी बांगर यांनी हे निर्देश दिले. यावेळी महापालिकेचे पायाभूत सुविधांचे उपायुक्त गिरीश निकम यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

लाल बहादूर शास्त्री मार्ग वरील भुयारी मार्गाचे काम डिसेंबर २०२५पर्यंत पूर्ण केले जाईल. धारावी बाजूकडील दुसऱ्या भुयारी मार्गाचे काम फेब्रुवारी २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल. रेल्वे पुलावरील उत्तर दिशेच्या अर्ध्या बाजूवर गर्डर स्थापित करण्याची कार्यवाही एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात केली जाईल. त्यानंतर रेल्वे हद्दीतील इतर कामे पूर्ण केली जातील. धारावी आणि लाल बहादूर शास्त्री मार्गाकडे जाणाऱ्या पोहोच रस्त्यांची कामे १५ एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण केली जातील. १५ एप्रिल २०२६ नंतर पूर्व बाजूच्या पोहोच रस्त्यांची कामे सुरू करण्यात येतील. हे काम पूर्ण करण्यासाठी ४५ दिवसांचा कालावधी आवश्यक आहे. या कालमर्यादेनुसार कार्यवाही झाली तर ३१ मे २०२६ पर्यंत पूल पूर्णत: तयार होईल. तसेच १ जून २०२६पासून पूल वाहतुकीस खुला करणे शक्य होईल, असेही बांगर यांनी स्पष्ट केले.

# समर्थ प्रतिष्ठान व महाराष्ट्र नवनिर्माण सेना आयोजित कोकण महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

# महोत्सवातील क्षणचित्रे




भाईंदर ( प्रतिनिधी ): समर्थ प्रतिष्ठान व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या संयुक्त विद्यमाने अध्यक्ष अनिल रानावडे यांच्या संकल्पनेतून २५ नोव्हेंबर ते ४ डिसेम्बर या दरम्यान नवघर शाळा मैदान, नवघर नाका, भाईंदर पूर्व येथे भव्य आगरी- कोळी - मालवणी -कोकणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कोकण महोत्सवाचे उदघाटन मनसे ठाणे जिल्हा प्रमुख अविनाश जाधव यांच्या हस्ते शिवसेना उपजिल्हा प्रमुख धनेश पाटील यांच्या उपस्थितीत मोठ्या जल्लोषात संपन्न झाले. या महोत्सवात विविध खाद्य संस्कृती, पारंपरिक लोककला, सुस्वर भजन स्पर्धा, मनोरंजन, जाखडी नृत्य, महिलांसाठी होम मिनिस्टर व इतर स्पर्धा, कोळी नृत्य आदी कार्यक्रम आयोजित केले होते. तसेच लहान मुलांसाठी या ठिकाणी विविध आकाश पाळणे, झोपाळे, ट्रेन उपलब्ध असल्यामुळे लहान मुले, मुलांसहीत तरुण तरुणींनी मनसोक्त धमाल केली.

विभागातील नागरिकांना आपल्या धाकाधुकीच्या जीवनातून छोटासा विरंगुळा मिळावा या हेतूने सदर कोकण महोत्सवाचं आयोजन केल्याचं समर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष आयोजक व मनसे शहर संघटक अनिल रानावडे यांनी मतं व्यक्त केलं.













सदर महोत्सवास शंकर विरकर, मोहन पाटील, बाळा नांदगावकर, नयनभाई कदम, विशाल पाटील आदींनी भेट दिली तर भाईंदर पूर्व विभागातील सर्व जात- धर्मीय लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद लुटला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष दिगंबर नलावडे, संजय जगताप, उपसचिव अनिल आंब्रे, खजिनदार अशोक सकपाळ, उपखजिनदार सुनिल शिंदे, गिरीश सावंत, भरत गायकर, संजय रटाटे, निलेश कोबनाक, डॉ. भरत झिंजुर्गे, सचिन भोईटे, रविंद्र पवार, अर्जुन कदम, सुहास लोंढे, अनिल कोटकर, कोंडीराम रानावडे, विवेक सावंत, अक्षता जाधव, रोशनी गावकर, विनायक काते, अनंत तांबे, सविता अधिकारी यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर! कधीपासून लागू होणार आठवा वेतन आयोग? सरकारनं दिली नेमकी माहिती




आठव्या वेतन आयोगाबाबतनवीन माहिती समोर आलीय. देशात सध्या एकूण ५.०१४ लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी कार्यरत आहेत.

तर अंदाजे ६९ लाख निवृत्तीवेतन धारक आहेत, त्यांना आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अंमलबजावणी चा फायदा होईल, अशी माहिती केंद्र सरकारने सांगितलंय. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तर देताना ही माहिती दिलीय.

लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात 1500 नाहीतर जमा होणार 3000 रुपये?लोकसभेत खासदारांनी आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीची तारीख, संदर्भ अटी (टीओआर), अर्थसंकल्पातील निधी वाटप आणि कर्मचारी आणि पेन्शन धारकांच्या तक्रारींवर सरकारची तयारी काय याबद्दल अनेक प्रश्न विचारले होते. त्याला उत्तर देताना अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी म्हणाले, आठवा वेतन आयोग त्याच्या स्थापनेपासून १८ महिन्यांच्या आत त्याच्या शिफारशी सादर करेल, तर अंमलबजावणी ची तारीख सरकार ठरवेल.

सोशल मीडियावर आणि कर्मचारी संघटनांमध्ये अशी चर्चा होती, की नवीन वेतन आयोग २०२६ च्या सुरुवातीपासून लागू होईल, परंतु सरकारने या अटकळींना पूर्णविराम दिलाय. आयोगाला अधिसूचनेच्या तारखेपासून (३ नोव्हेंबर २०२५) १८ महिने लागू शकतात आणि त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती अर्थ राज्यमंत्र्यांनी दिलीय.लोकसभेत खासदार - एन.के. प्रेमचंद्रन, थांगा तमिळसेल्वन आणि धर्मेंद्र यादव यांनी सरकारसमोर अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.यामध्ये आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीची तारीख, संदर्भ अटी (ToR) ची स्थिती, २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात त्यासाठी निधीची तरतूद आणि कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या समस्या येत आहेत, त्याला सरकार कसा प्रतिसाद देत आहे या प्रश्नाचा त्यात समावेश होता. तसेच आयोग अंतिम सूचना देण्यापूर्वी कर्मचारी संघटना, पेन्शनधारक संघटना आणि राज्य सरकारांशी सल्लामसलत करत आहे का, असा प्रश्नही विचारण्यात आला होता.

# हॉटेलमधल्या मोफत वस्तू घेऊन जाणं पडलं महागात!




मुंबई विरार- आपण कुठेही बाहेर फिरायला गेलो की, सगळ्यात आधी सामान ठेवण्यासाठी, तयार होण्यासाठी हॉटेल बुक करतो. आपण चांगल्या हॉटेलमध्ये राहतो तेव्हा त्या ठिकाणी आपल्याला अनेक सुविधा मिळतात. बाथरूममध्ये शाम्पू, कंडिशनर, बॉडी वॉश, हँडवॉश यांसारख्या अनेक वस्तूंच्या सोई-सुविधा आपल्याला तिथे दिल्या जातात. या वस्तू आपण घरी घेऊन येऊ शकत नाही; पण आज सोशल मीडियावर असा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, जो पाहून तुम्ही थक्कच होऊन जाल.एका जोडप्याने हॉटेलमध्ये बनवलेल्या रील पोस्ट केल्यानंतर वाद निर्माण झाला आहे. महिला हॉटेलच्या बाथरूम डिस्पेंसरमधून बॉडी वॉश गोळा करून आणते. ती इथपर्यंतच थांबत नाही; तर ती तो बॉडी वॉश घरी घेऊन जाण्यासाठी पाण्याच्या प्लास्टिकच्या दोन लहान बाटल्यांचा वापर करताना दिसते आहे. त्याचप्रमाणे हा व्हिडीओ तिच्या नवऱ्यानेच कन्टेन्ट म्हणून शूट करून पोस्ट केला होता, जो आता जोरदार व्हायरल होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होणारा हा व्हिडीओ @outofofficedaku या एक्स (ट्विटर) अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. तसेच 'मोफत गोष्टी बघून बायको…', अशी कॅप्शन व्हिडीओला देण्यात आली आहे. व्हिडीओ पाहून नेटकरी संमिश्र प्रतिक्रिया देत आहेत. काही जणांनी जोडप्यावर नागरिकत्वाची जाण नसल्याचा आरोप करीत आणि हॉटेलची मालमत्ता चोरली, अशी टीका केली आहे. तर अनेक युजर्सनी निदर्शनास आणून दिले की, टी बॅग्स, साबण, मिनी टॉयलेटरी यांसारख्या मोफत वस्तू घेऊन जाण्याबद्दल ठीक आहे. पण, वैयक्तिक कंटेनरमध्ये संपूर्ण डिस्पेंसर रिकामा करणे हे मर्यादा ओलांडण्यासारखं आहे.

# मराठी माध्यमाच्या सर्व प्रश्नपत्रिका शुद्ध मराठीत छापणार, युवासेनेच्या दणक्यानंतर मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक

**मुंबई** - विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष मराठी विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षेत अनेक प्रश्न इंग्रजी भाषेत दिल्याचे समोर आल्यानंतर युवासेनेने कुलसचिवांची भेट घेऊन मराठीची गळचेपी सहन करणार नाही, असे ठणकावले होते.

युवासेनेच्या दणक्यानंतर कुलसचिवांनी मराठी माध्यमाच्या सर्व प्रश्नपत्रिका शुद्ध मराठीतच काढण्यात याव्यात असे परिपत्रक काढण्याचे त्वरित आदेश दिले होते. त्याची अंमलबजावणी करण्यात आली असून विद्यार्थ्यांनी युवासेनेचे आभार मानले आहेत.द्वितीय वर्ष मराठी विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षेत




अनेक प्रश्न इंग्रजीत असल्याच्या तक्रारी शिवसेना नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याकडे आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत युवासेना सिनेट सदस्य शीतल शेठ-देवरुखकर, प्रदीप सावंत, शशिकांत झोरे आणि माजी सिनेट सदस्य राजन कोळंबेकर यांनी विद्यापीठाचे कुलसचिव प्रसाद कारंडे यांची भेट घेतली होती. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याचीही मागणी केली होती.

परिपत्रकात काय?यापुढे विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकांचे मराठीत भाषांतर करून त्या हस्तलिखित कक्षात जमा करण्यापूर्वी प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका हस्तलिखिते कक्षामध्ये जमा कराव्यात, असे परिपत्रकात नमूद आहे. तसेच इंग्रजी प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकांचे मराठीत भाषांतर करताना नेमणूक करण्यात आलेले संबंधित विषयाचे अध्यक्ष, अनुवादक, परीक्षक यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

## ठरवून बंद पाडलेल्या / पाडल्या जाणाऱ्या मराठी शाळांची परिषद

**दिनांक- १४ डिसेंबर २०२५**
**स्थळ- तिसरा मजला, राजर्षी शाहू सभागृह, श्री. शिवाजी मंदिर, दादर (प), मुंबई.**
**वेळ - सकाळी १० ते दु. २.**

ठरवून बंद पडलेल्या / पाडल्या जाणाऱ्या मराठी शाळांची माहिती आपल्याकडे असल्यास तात्काळ आम्हाला कळवा, असे आवाहन आपल्याला करीत आहोत. अधिक माहितीसाठी **संपर्क - सुशील शेजुळे- ९६०४५२३६६६, अण्णासाहेब चवरे -९८६००९००९४**

## संक्षिप्त बातम्या

### स्मृती-पलाशचं लग्न अखेर मोडलं

भारतीय महिला संघांची उपकर्णधार स्मृती मानधना आणि सिने संगीतकार पलाश मुच्छल यांच्या लग्नाबाबत गेले काही दिवस सोशल मीडियावर बऱ्याच चर्चा सुरू आहेत. २३ नोव्हेंबर २०२५ ला होणारा दोघांचा लग्नसोहळा अचानक स्थगित करण्यात आला.

त्यावेळी स्मृतीच्या वडीलांची प्रकृती बिघडल्याचं कारण समोर आलं होतं. मात्र त्यानंतर सोशल मीडियावर पलाश मुच्छल हा स्मृतीशी एकनिष्ठ नसल्याच्या पोस्ट समोर आल्या होत्या. त्यानंतर रविवारी स्मृतीने स्वत: लग्न मोडल्याचं जाहीर केलं आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या आयुष्याबाबत अनेक चर्चा सुरू आहेत आणि मला वाटतं की यावेळी मी याबद्दल बोलणं महत्त्वाचं आहे. माझं लग्न रद्द करण्यात आलं आहे.मला हे संपूर्ण प्रकरण इथेच संपवायचं आहे. मी तुम्हाला विनंती करते की कृपया यावेळी दोन्ही कुटुंबांच्या गोपनीयतेचा आदर करा आणि आम्हाला यातून बाहेर पडण्यासाठी थोडा वेळ द्या. भारतासाठी खेळत राहणं हेच माझं ध्येय आहे. तुमच्या सर्वांच्या पाठिंब्याबद्दल धन्यवाद. पुढे जाण्याची वेळ आली आहे. स्मृती-पलाश यांचा लग्नसोहळा स्थगित झाल्यानंतर स्मृतीने तिच्या इन्स्टाग्रामवरून लग्नासंबंधित फोटो, व्हीडिओ डिलीट केले होते. स्मृतीने टीम इंडियामधील तिच्या खास मैत्रिणींबरोबर साखरपुडा झाल्याची घोषणा करत एक खास व्हीडिओ शेअर केला होता, तो व्हीडिओही स्मृतीने डिलीट केला. दरम्यान पलाश मुच्छलने सुद्धा इन्स्टा स्टोरी पोस्ट करत लग्न रद्द केल्याची माहिती दिली आहेमी माझ्या आयुष्यात पुढे जाण्याचा आणि माझ्या वैयक्तिक नातेसंबंधातून मागे सरकण्याचा निर्णय घेतला आहे. लोकांनी कोणताही आधार नसलेल्या अफवांवर इतक्या सहज विश्वास ठेवून प्रतिक्रिया देताना पाहणं माझ्यासाठी खूप कठीण होतं. माझ्यासाठी खूप महत्त्वाच्या गोष्टींबद्दल या अफवा पसरल्या, आणि हा माझ्या आयुष्यातला फार कठीण काळ आहे, पण मी माझ्या मूल्यांवर ठाम राहून शांतपणे याला सामोरे जाईल, असं पलाशने सांगितलेदोघांनी एकमेकांना सोशल मीडियावर अनफॉलो केलंय. दरम्यान वर्ल्ड कप जिंकल्यानंतर स्मृती आणि पलाश नवी मुंबईतील डी. वाय. पाटील मैदानात एकत्र दिसले होते.


# 'इंडिगो'ने प्रवाशांना तब्बल ८२७ कोटी केले परत; आजही ५०० उड्डाणे झाली रद्द !

भारतातील आघाडीची विमान कंपनी असणारी इंडिगोने आज (सोमवार) ५०० उड्डाणे रद्द केली, तर नागरी उड्डाण मंत्रालयाने म्हटले आहे की १ ते ७ डिसेंबर या कालावधीसाठी बुक केलेल्या ५८६,७०५ तिकिटांसाठी पीएनआर रद्द करण्यात आले आहेत आणि एकूण ५६९.६५ कोटी रुपयांचे परतावे जारी करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, २१ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर दरम्यान एकूण ९५५,५९१ पीएनआर रद्द करण्यात आले आणि




एकूण ८२७ कोटी रुपये परत करण्यात आले.

तर या पार्श्वभूमीवर आता विमान कंपनीने नऊ हजार बॅगांपैकी साडेचार हजार बॅगा प्रवाशांना परत केल्या आहेत आणि उर्वरित बॅगा पुढील ३६ तासांत प्रवाशांना परत केल्या जाणार आहेत.मंत्रालयाने म्हटले आहे की, "नवीन नियम आणि क्रू ड्युटीशी संबंधित नियामक मानकांमध्ये बदल झाल्यामुळे, इंडिगो २ डिसेंबरपासून दररोज शेकडो उड्डाणे रद्द करत आहे. यामुळे देशभरातील लाखो प्रवाशांना मोठी गैरसोय आणि समस्या निर्माण झाल्या आहेत."



# ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांचे निधन; वयाच्या ९६व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

पुणे : महाराष्ट्राच्या समाजसेवा आणि श्रमिक चळवळींचे प्रणे असलेले ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव (बाबासाहेब पांडुरंग आढाव) यांचे आज पुण्यातील पूना हॉस्पिटलमध्ये वयाच्या ९६व्या वर्षी निधन झाले.

गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती गंभीर असल्याने आयसीयूत दाखल होते. त्यांच्या निधनाने सर्वसामान्यांचा, विशेषतः कष्टकरी आणि हक्कांसाठी लढणाऱ्यांचा एक मोठा आवाज हरपला आहे.बाबा आढाव कोण होते?

डॉ. बाबासाहेब पांडुरंग आढाव (१९२९-२०२५) हे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे एक खंदे योद्धे आणि श्रमिक-कष्टकऱ्यांचे खरे कैवारी होते. पुण्यात जन्मलेले बाबा आढाव १९७० च्या दशकात पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक होते आणि समाजवादी पक्षाचे सक्रिय सदस्य होते. रिक्षा चालक, हमाल, माथाडी कामगार यांच्यासाठी त्यांनी 'हवालदार पंचायत' स्थापन केली आणि आयुष्यभर त्यांच्या हक्कांसाठी लढले.

बाबा आढाव यांच्या मोहिमा आणि योगदानएक गाव एक पाणवठा : जातीय भेदभाव संपवण्यासाठी आणि दलित-बहुजनांना पाणवठ्यावर समान हक्क मिळावा यासाठी त्यांनी राज्यव्यापी मोहीम उभी केली. ही मोहीम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात क्रांती घडवणारी ठरली.

**श्रमिक चळवळ :** हमाल-माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी, रिक्षा-टॅक्सी चालकांच्या हक्कांसाठी त्यांनी अनेक उपोषणे आणि आंदोलने केली.


**जातीयविरोधी लढा :** अस्पृश्यता, जातीय भेदभाव यांच्याविरुद्ध आयुष्यभर लढणारे बाबा आढाव हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे कट्टर अनुयायी होते.

**निवडणूक सुधारणा :** २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर ईव्हीएम बाबत संशय व्यक्त करत त्यांनी उपोषण केले.**"लोकशाही वाचली पाहिजे"** ही त्यांची शेवटची मोहीम होती.

# मुंबई ते गोवा प्रवास सुस्साट !

## १५ वर्षांपासून रखडलेल्या महामार्गाला नवी डेडलाईन; नितीन गडकरींनी दिली महत्त्वाची अपडेट

मुंबई: गेल्या 15 वर्षांपासून रखडलेला मुंबई–गोवा महामार्ग प्रकल्प अखेर निर्णायक टप्प्यात आला आहे. गुरुवारी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत महत्त्वाची माहिती देत या महामार्गाला नवी डेडलाईन जाहीर केली. आता कोकणातून मुंबईकडे जाणे पूर्वीपेक्षा अधिक जलद आणि सोपे होणार आहे. हिवाळी अधिवेशना दरम्यान



महाराष्ट्रातील तीन महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांचा आढावा घेताना त्यांनी या महामार्गाच्या पूर्णत्वाबद्दल स्पष्ट माहिती दिली.

2009 मध्ये सुरू झालेल्या या महामार्गाचा 89 टक्के भाग पूर्ण झाल्याचे गडकरी यांनी सांगितले. उर्वरित काम एप्रिल 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार अर्विंद सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ही माहिती त्यांनी दिली.

मुंबई-गोवा महामार्ग कोकणातून जात असून, रस्ते, महामार्ग आणि द्रुतगती मार्गांचा समावेश करून बांधण्यात आला आहे. पनवेल, रत्नागिरी, गोवा यांसह अनेक ग्रामीण भागांनाही हा महामार्ग जोडणार आहे. हा चार पदरी महामार्ग असून पूर्वी 2025ची डेडलाईन देण्यात आली होती, मात्र विविध कारणांमुळे कामात विलंब झाला. आता मात्र प्रकल्प अंतिम टप्प्यात असून 2026 मध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.

## भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका:

# दिग्गजांची 'विराट' कामगिरी आणि नव्या युगाचा उदय



**भास्कर गाणेकर**: नुकत्याच विशाखा पट्टणम येथे पार पडलेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसऱ्या निर्णायक एकदिवसीय सामन्यात भारताने ९ गडी राखून दणदणीत विजय मिळवला आणि मालिका २-१ ने आपल्या नावे केली. हा सामना तसेच संपूर्ण मालिका भारतीय क्रिकेटमधील दोन पिढ्यांमधील स्थित्यंतराचा एक उत्तम नमुना ठरला. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोन अनुभवी शिलेदारांनी पुन्हा एकदा आपल्या फलंदाजीची धार दाखवून दिली आणि आपले काम चोख बजावल्यानंतर, प्रसिद्धीचा झोत नव्या दमाच्या खेळाडूंवर, विशेषतः यशस्वी जयस्वालवर राहू दिला.रोहित शर्मा: मार्गदर्शकाची भूमिका कर्णधारपदाची धुरा के. एल. राहुलच्या खांद्यावर असली तरी, मैदानावर खरी सूत्रे रोहित शर्माच्या हाती असल्याचे दिसून आले. रोहितने ७३ चेंडूत ७५ धावांची आक्रमक खेळी करत भारताच्या विजयाचा पाया रचला. या खेळी दरम्यान त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०,००० धावांचा टप्पाही पार केला. यशस्वी जयस्वाल सोबत १५५ धावांची भागीदारी करताना रोहितने एका मोठ्या भावाप्रमाणे त्याला मार्गदर्शन केले. मैदानावर गोलंदाजांना सल्ले देणे असो वा अचूक डीआरएस (D R S) निर्णय घेणे, रोहितचा वावर ठळक होता. मात्र, आपले काम होताच त्याने शांतपणे 'बॅकग्राउंड'मध्ये जाणे पसंत केले आणि जयस्वालला त्याचे पहिले शतक साजरे करू दिले.विराट कोहली: 'किंग'चा दरारा रोहित बाद झाल्यानंतर आलेल्या विराट कोहलीने (नाबाद ६५) आपल्या जुन्या आक्रमक शैलीची आठवण करून दिली. त्याने अवघ्या ४५ चेंडूत सामना संपवून भारताचा विजय निश्चित केला. ३०२ धावांसह 'प्लेअर ऑफ द सिरीज' ठरलेल्या विराटने दाखवून दिले की. आजही तो जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम फिनिशर आहे.तात्पर्य असे की, रोहित आणि विराट या जोडीने आपल्या कौशल्याने सामना एकतर्फी केला. त्यांनी संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून सोडले, पण विजयाचे श्रेय घेताना त्यांनी अनावश्यक बडेजाव केला नाही. त्याऐवजी, त्यांनी यशस्वी जयस्वालसारख्या युवा खेळाडूला पुढे केले. 'काम फत्ते करणे आणि शांतपणे बाजूला होणे' ही या दिग्गजांची वृत्ती भारतीय क्रिकेटच्या उज्ज्वल भविष्याची ग्वाही देते.

# रोहित आणि कोहली: २०२७ विश्वचषकाचं स्वप्न पुन्हा जिवंत का वाटू लागलं?

**संदीपन बॅनर्जी-** दक्षिण आफ्रिकेत ०–२ ने हरलेल्या कसोटी मालिकेनंतर भारताची वनडे संघरचना नव्या उमेदीने उभी राहिल्यासारखी वाटली. आणि त्या पुनरुज्जीवनाच्या केंद्रस्थानी होते. दहा वर्षांहून अधिक काळ भारतीय लाल-चेंडू क्रिकेट घडवणारे दोन दिग्गज: रोहित शर्मा आणि विराट कोहली.

ऑस्ट्रेलिया मालिकेत आणि त्यानंतरच्या दक्षिण आफ्रिके विरुद्धच्या वनडेमध्ये त्यांच्या खेळात जाणवणारा बदल स्पष्ट होता. केवळ धावा किंवा विक्रमांमध्ये नव्हे, तर त्यांच्या शारीरिक हावभावात, तीव्रतेत आणि मागील दोन वर्षांत दिसून न आलेल्या तातडीच्या भावनेत. भारतीय क्रिकेटने "जुन्या खेळाडूंवरील अवलंबित्व कमी करावे" अशा चर्चा वाढत असतानाच, रोहित आणि कोहली यांनी सर्वात प्रभावी उत्तर दिलं ते बाकी सर्वांपेक्षा जास्त धावा करून. ऑस्ट्रेलियातील १६८ धावांच्या भागीदारीने 'विंटेज' रोहित–कोहली काय असतं ते पुन्हा दाखवलं. रोहितची आक्रमकता आणि कोहलीची अचूकता—जणू दोघेही पुन्हा आपल्या जुन्या लयीत आले होते. हीच लय दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मालिकेतही टिकली. जिथे चेन्नईत त्यांनी १३६ धावा जोडत पुन्हा एकदा गोलंदाजांना धक्का दिला. क्षणभर असं वाटलं की दोघेही शतकं झळकवतील. कोहलीने ते साध्य केले, रोहित थोडक्यात राहिला. पण या जोडीने दिलेला संदेश शतकांपेक्षा खूप मोठा होता. त्यांच्या पुनरागमनामागे एक वेगळीच कहाणी होती. कोहलीने वनडे मध्ये सहजतेने षटकार मारण्याची शैली स्वीकारली. तर रोहित अधिक तंदुरुस्त, चपळ आणि एकाग्र दिसला—डायव्ह घेणारा, सीमारेषा वाचवणारा आणि डावाचा गतीमान वेग ठरवणारा. २०२७ विश्वचषकाचा मार्ग अजून खुला असेल, तर हा मार्ग स्वतःकडे खेचून घ्यावा लागेल, हे दोघांनीही ओळखलंय.

आकडेवारी त्यांच्या फॉर्मला दृढ पुरावा देते. कोहली (६५१) आणि रोहित (६५०) हे यावर्षी भारतासाठी सर्वाधिक एकदिवसीय धावा करणारे फलंदाज. कोहलीचा सरासरी ६५.१०, रोहितचा ५०, आणि दोघांचेही स्ट्राइक रेट ९५च्या पुढे. कोहलीकडे तीन शतकं, रोहितकडे दोन. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने एकत्र खेळणारी ही जोडी आता ४०० सामन्यांच्या उंबरठ्यावर आहे.

परंतु आकडेच सर्व काही सांगत नाहीत. कसोटीत निरुत्साही झालेल्या संघात ही दोघं उतरली आणि वातावरणच बदलून गेलं. कोहलीची उर्जा—कुलदीपसोबतचा नाच, अर्शदीपसोबतचं हसणं—संघाला पुन्हा जिवंत करणारी होती. तर रोहितची हसरी पण आक्रमक मैदानावरील उपस्थिती पुन्हा झळकली, विशेषतः कुलदीप सोबतच्या D R S वरील हलक्याफुलक्या खोड्या. अशा क्षणांचं महत्त्व तरुण खेळाडूंना नेतृत्वाचा खरा अर्थ सांगतं.

२०२७ अजून लांब आहे. फॉर्म येईल-जाईल, तरुण खेळाडू स्पर्धा देत राहतील. गौतम गंभीर यांनीही सांगितलंय की विश्वचषकासाठी इतक्या आधी ठोस नियोजन करणं अवघड आहे. पण आजच्या परिस्थितीत रोहित आणि कोहली यांना भारताच्या वनडे रणनीतीबाहेर ठेवणं कठीण वाटतं.

२०२३ नंतर पहिल्यांदा भारताची एकदिवसीय संघाची संघरचना पुन्हा स्थिर दिसत नाही. आणि त्या स्थैर्याच्या मध्यभागी उभे आहेत तेच दोन दिग्गज — जे शांतपणे बाजूला होण्यास अजून तयार नाहीत

# भारताची विजयी सलामी



पहिल्या टी-२० सामन्यात १७५ धावांचे लक्ष्य पार करण्यास उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेला स्वस्तात गुंडाळून भारताने १०१ धावांनी सामना जिंकला. कट्टक: फेब्रुवारी महिन्यात होऊ घातलेल्या टी-२० विश्वचषकाच्या अनुषंगाने भारत आफ्रिका यांच्या चालू असलेल्या पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेत भारताने पाहुण्यांना १०१ धावांनी नमवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. हार्दिक पांड्याच्या तुफानी खेळीनंतर सर्वच गोलंदाजांनी केलेली अचूक टप्प्याची गोलंदाजी भारताच्या विजयाचे वैशिष्ट्य ठरले.

# आफ्रिकेला केले ७४ धावात गारद

नाणेफेक गमावल्यानंतर अडखळत सुरुवात केलेल्या भारताला मधल्या फळीने सावरले. हार्दिक पांड्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये बऱ्याच कालावधीने पुनरागमन करीत आफ्रिकेच्या गोलंदाजांना बदडले. ४८ धावांत पहिले तीन फलंदाज गमावलेल्या भारताने हार्दिकच्या खेळीच्या जोरावर १७५ धावांपर्यंत मजल मारली. तिलक वर्मा (२६) व अक्षर पटेल (२३) यांनी त्याला योग्य साथ दिली. हार्दिकने २८ चेंडूंचा सामना करीत सहा चौकार व चार षटकार ठोकत ५९ धावांची खेळी केली. त्याचे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधले हे सहावे अर्धशतक ठरले.

धावांचा पाठलाग करण्यास उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेला भारतीय गोलंदाजांनी एका मागून एक धक्के देत सामन्यात परतण्याची संधीच दिली नाही. भारताचा टी-२० क्रिकेटमधला सर्वात यशस्वी गोलंदाज अर्शदीप सिंगने क्विंटन डी-कॉकला भोपळाही न फोडू देता माघारी धाडत दक्षिण आफ्रिकेच्या डावाला गळती लावली. पुन्हा तिसऱ्या षटकात स्टब्सला बाद करीत पाहुण्यांची अवस्था दोन बाद १६ अशी केली. अक्षर पटेलने मार्कमचा त्रिफळा उडवत डाव उध्वस्थ करण्यास सुरुवात केली.जसप्रीत बुमरा, वरूण चक्रवर्ती या स्पेशालिस्ट गोलंदाजांनी ही आपला अनुभव पणाला लावत प्रत्येकी दोन गादी बाद केले. १३ व्या षटकातच ७४ धावांत खुर्दा पाडत सामना १०१ धावांनी जिंकला.

युवा सह्याद्री हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक अरुण आत्माराम माळी यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, ७, उद्योग भवन, शर्मा इंडस्ट्रीयल इस्टेट, वालभट रोड, गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
येथे छापून, प्रसाद आर्ट शॉप नं. एस-२, श्रीकृपा को. ऑ. हौ. सोसायटी, डॉ. आंबेडकर रोड, मुंबई-४०० ०३३ येथून प्रकाशित केले.
संपादक अरुण आत्माराम माळी. Contact: 9821004969 | Email: yuvasahyadri@gmail.com | Web.: www.yuvasahyadri.com